Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
ba.section@unishivaji.ac.in ०२३१२६०९११५-१६

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/एस.सी.एल/७७४ दिनांक - ०६/११/२०२३

**अत्यंत महत्वाचे आणि तातडीचे**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित सर्व कला महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

विषय - ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२३ मधील प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाच्या थेअरी, अंतर्गत व प्रात्यक्षिक परीक्षेच्या नियमित व दूर शिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद संगणक प्रणालीत करणेबाबत...

संदर्भ - संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/५९२ दि. ३०/०९/२०२३ रोजीचे परीपत्रक.
संदर्भ क्र. शिवाजी वि/ऑन परीक्षा/एस.सी.एल./६१२ दि. ११/१०/२०२३ रोजीचे परीपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय परीपत्रकास अनुसरून कळविण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२३ या उन्हाळी सत्रातील प्रथम वर्षाच्या व व्दितीय वर्षाच्या परीक्षा दि. ३०/१०/२०२३ ते ०६/१२/२०२३ या कालावधीमध्ये महाविद्यालयाने नियोजन करण्यात यावे असे आदेश झाले आहेत. तरी प्रथम व व्दितीय वर्षाच्या Sem/CBCS/NEP इ. (सत्र १ ते ४) परीक्षांच्या गुणांची नोंद खाली नमुद केलेल्या लिंक व्दारे करण्यात यावी.

https://sukapps.unishivaji.ac.in/exam-app/#/login या लिंक वर महाविद्यालयाचे लॉगिन करून प्रचलित पध्दतीने गुणांची नोंद करून बी.ए. अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर दि. १६ डिसेंबर २०२३ पर्यंत गुणांची नोंद कन्फर्म करून कन्फर्म उल्लेख असलेली गुणांची ई-मार्कलिस्ट संबंधित विभागात दि. १८ डिसेंबर २०२३ पर्यंत वेळेत जमा करावी. सदर गुणांची नोंद जर वेळेत संगणक प्रणालीत झाली नाही तर निकालानंतर दिलेल्या गुणांची नोंद घेण्यासाठी दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

टिप - १. परीक्षा चालू असताना **NEP** (फ्रेश सत्र १,३ रिपिटर सत्र २) विद्यार्थ्यांना **NEP** अभ्यासक्रमाचीच प्रश्नपत्रिका द्यावी. तसेच **CBCS** (रिपीटर सत्र १,२,३,४) विद्यार्थ्यांना **CBCS** अभ्यासक्रमाचीच प्रश्नपत्रिका द्यावी. कारण **NEP** अभ्यासक्रम हा ४०/१० व **CBCS** अभ्यासक्रम हा ५० गुणांचा आहे. चुकीची प्रश्नपत्रिका महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना सोडवायला दिल्यास अशी बाब विद्यापीठाच्या निदर्शनास आल्यास विद्यापिठ नियमानुसार संबंधित महाविद्यालयास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.